# ५. अङ्गुलिमाल भिक्खू

**प्रस्तावना**

ही तथागताच्या जीवन काळामध्ये घडलेली ऐतिहासिक घटना आहे. आजही समाजाच्या शांततेसाठी आणि सुव्यवस्थेसाठी, समाजातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होण्यासाठी हा आदर्श आवश्यक आहे. शस्त्राने किंवा दंडाने गुन्हेगार गुन्हे करण्यापासून परावृत्त होऊ शकत नाही. त्यासाठी गुन्हेगाराचे मन परिवर्तन होणे आवश्यक आहे. तथागत बुद्ध आणि अङ्गुलिमाल यांची भेट या दृष्टीने महत्त्वाची आहे. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे मनुष्य जन्माने गुन्हेगार नसतो, वाईट स्वभावाचा नसतो.

भारत सरकारने सुद्धा गुन्हेगारांना अमानुष शिक्षा देण्याच्या पद्धतीत फरक केला आहे. महाराष्ट्र सरकारने ‘खुले कारागृह’ गुन्हेगारामध्ये सुधारणा करण्यासाठी ही योजना अमलात आणली. बालगुन्हेगारांना सुधारण्यासाठी सरकारने ‘सुधारणा शाळा’ सुरू केल्या आहेत. त्यामुळे गुन्हेगार नेहमीच गुन्हेगार राहू शकत नाही. जर त्याच्या मनात (वर्तनात) बदल घडून आला तर तो एक आदर्श नागरिकही होऊ शकतो.

कायद्याने सुद्‌धा सुधारणा होत असते असे नाही. कायदा कमी पडल्यास धम्मानेच काम करावे लागते. अहिंसक नावाचा मेधावी शिष्य केवळ सहपाठी वर्गबंधूच्या आणि गुरूच्या चुकीच्या निर्णयामुळे किती भयंकर अपराधी बनतो, तसेच तथागत बुद्धाच्या प्रभावाने अङ्गुलिमालाच्या जीवनात आमूलाग्र बदल होऊन तो महान अर्हंत भिक्खू कसा होतो या विषयाचे आपले मनोगत तो अङ्गुलिमाल या कवितेत व्यक्त करतो.

म्हणून शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्यासाठी, आतंकवाद नष्ट करण्यासाठी बुद्ध उपदेश देतात.

‘‘गच्छं वदेसि समण ठितोम्हि, ममं च बूसि ठितमट्ठितो’ ति।
पुच्छामि तं समणं एतमत्थं, कथं ठितो त्व अहमट्ठितोम्हि’’ ।।१।।



''ठितो अहं अङ्गुलिमाल सब्बदा, सब्बेसु भूतेसु निधाय दण्डं।
तुवं च पाणेसु असञ्ञतोसि, तस्मा ठितोहं तुवमट्ठितो'सि ।।२।।

''चिरस्सं वत मे महितो महेसि, महावनं समणो पच्चुपादि।
सो'हं चजिस्सामि सहस्सपापं, सुत्वान गाथं तव धम्मयुत्तं ।।३।।

इच्चेव चोरो असिमावुधं च, सोब्भे पपाते नरके अन्वकासि ।
अवन्दि चोरो सुगतस्स पादे, तत्थेव पब्बज्जमयाचि बुद्धं ।।४।।



बुद्धो च खो कारूणिको महेसि, सो सत्था लोकस्स सदेवकस्स ।
तं 'एहि भिक्खू' ति तदा अवोच, एसेव तस्स अहु भिक्खुभावो ।।५।।

''यो च पुब्बे पमज्जित्वा, पच्छा सो नप्पमज्जति।
सोमं लोकं पभासेति, अब्भा मुत्तो' व चन्दिमा ।।६।।

''यस्स पापं कतं कम्मं, कुसलेन पिधीयति ।
सोमं लोकं पभासेति, अब्भा मत्तो' व चन्दिमा।।७।।

''उदकं हि नयन्ति नेत्तिका, उसुकारा नमयन्ति तेजनं।
दारूं नमयन्ति तच्छका, अत्तानं दमयन्ति पण्डिता ।।८।।

''दण्डेन दमयन्ति, अंकुसेहि कसाहि च ।
अदण्डेन असत्थेन, अहं दन्तोम्हि तादिना ।।९।।

‘‘अहिंसको ति मे नामं, हिंसकस्स पुरे सतो ।
अज्जाहं सच्चनामोम्हि, न नं हिंसामि किञ्चनं ।।१०।।

‘‘लोहितपाणि पुरे आसिं, अङ्गुलिमालो’ ति विस्सुतो ।
सरणागमनं पस्स, भवनेत्ति समूहता ।।११।।

‘‘ब्रह्मजच्चो पुरे आसिं, उदिच्चो उभतो अहु।
सोज्ज पुत्तो सुगतस्स, धम्मराजस्स सत्थुनो ।।१२।।

**(थेरगाथा)**

## शब्दार्थ

**गच्छं (पु.)** – जाणे, चालताना
**समण (पु.)** – श्रमण
**आयुध (नपुं.)** – हत्यार, शस्त्र
**अवोच** – म्हणाला
**पभासेति (क्रि.)** – प्रकाशित करतो
**मुत्त (कृ.)** – मुक्त, स्वतंत्र, मोकळा
**तच्छका (पु.)** – सुतार, लाकूडकाम करणारा
**अङ्कुस (पु.)** – अंकुश
**विस्सुत (वि.)** – प्रसिद्ध, विख्यात
**सोब्भ (नपुं.)** – खड्डा, जलाशय, तळे
**भूतेसु (पु. नपुं.)** – प्राण्यामध्ये
**पपाते (पु.)** – वरून पडणारा प्रवाह, अधोगती
**पमज्जित्वा (पू. क्रि.)** – प्रमाद करून, बेपर्वाई करून
**पिधीयति (कृ.)** – झाकतो, झाकले जाते
**नेत्तिका (पु.)** – शेतात पाण्याचा पाट करणारा नेतृत्व करणारा, नेणारा
**दमयन्ति (क्रि.)** – दमन करतात
**लोहितपाणि (वि.)** – रक्ताने हात माखलेला.
**समुहता (पु.)** – मूळासह नष्ट करणे

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा –**

१) अंगुलिमालाने तथागताला काय विचारले?
२) तथागत कोणत्या अर्थाने थांबलेला आहे?
३) अंगुलिमालाने तथागताकडे कशाची मागणी केली?
४) अंगुलिमाल कशाप्रकारे भिक्खू झाला?
५) पंडित आपले दमन कशाप्रकारे करतो?
६) तथागताने अंगुलिमालाचे दमन कशाप्रकारे केले?
७) पूर्वी अंगुलिमाल कसा प्रसिद्ध होता?

## २. सत्य / असत्य लिहा –

१) गच्छं वदेसि समण ठितोम्हि ।

२) ठितो त्वं अंगुलिमाल सब्बदा ।

३) सोमं लोकं पभासेति अब्भा मुत्तो’ व सुरियो ।

४) अदण्डेन असत्थेन, अहं दन्तोम्हि तादिना।

५) हिंसको’ ति मे नामं, हिंसकस्स पुरेसतो ।

## ३. खालील प्रश्नांची सूचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.

१) पुच्छामि तं .......... एतमत्थ । (समण/ब्राह्मण) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

२) उदकं हि ........... नेत्तिका । (नेति/नयन्ति) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

३) अहिंसकोति मे नामं ........ पुरेसतो । (हिंसकस्स/हिंसका) यापैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.

४) पभासेति । (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)


५) तच्छका । (माध्यम भाषेत अर्थ लिहा.)

६) अज्जाहं (संधी विग्रह करा)

७) सोहं (संधी विग्रह करा)

८) पमज्ज (पूर्वकालवाचक अव्यय बनवा)

## ४. जाळरेखाचित्र पूर्ण करा.




## ५. दीर्घोत्तरी प्रश्न.

१) अंगुलिमालाचे जीवन चरित्र लिहा.

२) अंगुलिमाल अहिंसक कसा झाला ते लिहा.

☆☆☆